जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

जाहीर निविदा

जळगांव जिल्हयातील तमाम शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारची अग्नीशमन संच (Water, Dry Powder, ABC Type etc.) **पुनर्भरणी** (Refilling) करुन देणा–या पुरवठादारांना याद्वारे कळविण्यांत येते कि, ज्या पुरवठादारांना जिल्हा न्यायालय, जळगांव व जिल्हा न्यायालयाचे अखत्यारितील तालुका न्यायालयातील अग्नीशमन संच पुनर्भरणी (Refilling) करुन देणेस स्वारस्य असेल त्यांनी आपले दरपत्रक भरुन बंद पाकिटातून, पाकीटावर अग्नीशमन संच पुनर्भरणीबाबतचे दरपत्रक असा उल्लेख करुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने बंद पाकीट म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव, कक्ष कमांक 101 यांच्याकडेस दिनांक 10/09/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 11/09/2025 रोजी मा. जिल्हा न्यायाधीश–1 व अति. सत्र न्यायाधीश, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

सर्वसाधारण अटी

1. दरपत्रकात अग्नीशमन संचाचे प्रकारानुसार (Water, Dry Powder, ABC Type etc.) तसेच अग्नीशमन संचाचे क्षमतेनुसार पुनर्भरणी (Refilling) चे दर नमुद करावे लागतील.

2. अग्नीशमन संच पुनर्भरणी करणारे पुरवठादार हे तालुका न्यायालयातील अग्नीशमन संच पुनर्भरणी करण्याचे काम स्वखर्चाने करणार आहेत किंवा प्रवास भत्ता आकारणार आहेत याबाबत दरपत्रकात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. प्रवास भत्ता आकारणार असल्यास प्रती तालुका किती रक्कम आकारणार आहेत त्याबाबतचे दर नमुद करण्यात यावेत.

3. दरपत्रक स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा.जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

4. दरपत्रकातील दर सर्व करांसह भरावे. मात्र व्हॅट/जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा दर देयकात स्वतंत्र नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल.

5. अग्नीशमन संच पुनर्भरणी अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात करण्याचे अधिकार म. जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच अग्नीशमन संच पुनर्भरणी उधारीवर करावयाची आहे. त्यानंतर सदर बिलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

6. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा नसल्यास त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

7. दरपत्रकातील दर दिनांक 31.12.2025 पर्यंत कार्यरत राहतील किंवा कसे ? याबाबतचा स्पष्ट खुलासा करावा.

8. अग्नीशमन संच पुनर्भरणी करण्याचे पुरवठा आदेश देवूनही मुदतीत अग्नीशमन संच पुनर्भरणी न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

9. सदरची जाहीर निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांवचे संकेतस्थळ http://ecourts.gov.in/jalgaon वर पाहता येईल.

VJKankar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क./रोखशाखा/4753 /2025
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक 25/08/2025.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

O/C

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. म.न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
7. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांवचे संकेतस्थळावर (http://ecourts.gov.in/jalgaon)